आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय व त्यांच्या अधीनस्त कार्यालयास नवीन संगणक व इतर अनुषंगिक साहित्य खरेदी करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
शासन निर्णय क्र. कौविउ २०१६ /प्र.क्र.१९२ /रोस्वरो -१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०७ नोव्हेंबर, २०१७.

वाचा :- १) आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, नवी मुंबई यांचे क्र. कौविरोवउसं-७ / संगणक /२३२ /२०१६-१७ /३८०४, दि. १५.५.२०१७ चे पत्र.
२) महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाचे इनव्हाईस नं. MahaIT/PSR/001/124 /2017, Dated 7.9.2016.

आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, नवी मुंबई व त्यांच्या अधीनस्त जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रास पुरविण्यात आलेले आणि ३१.१२.२०१५ रोजी ५ वर्ष पूर्ण झाल्याने माहिती तंत्रज्ञान विभागाच्या दि. १.८.२०११ च्या शासन निर्णयान्वये निर्लेखनास पात्र झालेल्या संगणकाऐवजी नवीन संगणक प्रणाली खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, नवी मुंबई यांना डेस्कटॉप संगणक-२२२, लेझर प्रिंटर्स-३६, लॅपटॉप (आय ३)- ५३, प्रोजेक्टर्स-३१ व ५ केव्हीए युपीएस -२४ विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आणि उपरोक्त वाचा क्र. २ येथील महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाचे इनव्हाईस नं. MahaIT/PSR/001/124 /2017, Dated 7.9.2016 मधील अटी व शर्तीच्या अधीन राहून खरेदी करण्यास रु. २,१९,०८,४९७.०० (रु. दोन कोटी एकोणीस लक्ष आठ हजार चारशे सत्याण्णव फक्त) इतक्या अंदाजित खर्चास पुढील तक्त्यात दर्शविलयाप्रमाणे या शासन निर्णयान्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

Sr N0	Item Description	Quantity	Rate	Amount (In Rs.)
1	All-in One (i3)	222	50,000.00	1,11,00,000.00
2	Laptop Intel-Entry Levet (i3)	53	57,167.00	30,29,851.00
3	Laser Jet Mono Mid Range Duplex Printer (28PPM)	36	11,624.00	4,18,464.00
4	Projector LCD (3000)	31	35,000.00	10,85,000.00
5	Online UPS 6 K.V.A 60 Minutes Backup	24	1,22,217.00	29,33,208.00
	1) Total Amount (Rs.)-			1,85,66,523.00
	2) Central Goods & Services Tax @9.00 % on (1)			16,70,987.00
	3) State Goods & Services Tax @9.00 % on (1)			16,70,987.00
	Gross Total (1+2+3)			2,19,08,497.00

२. सदर खर्च मागणी क्र. झेडए-१, २२३० कामगार व सेवायोजन, ०२, सेवायोजेन सेवा, ००१ संचालन व प्रशासन, (०२)(०१) सेवायोजन कार्यालयात संगणित्राची पध्दती सुरु करणे (२२३०१०९२) १३ कार्यालयीन खर्च (योजनांतर्गत) या लेखाशीर्षाखालील सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. याकरिता आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, नवी मुंबई यांना आहरण, संवितरण व नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. संचालनालयाने प्राप्त निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र वर्ष अखेरीपूर्वी शासनास सादर करावे.

४. सदर शासन निर्णय वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र २०१३/प्रक्र.३०/२०१३/विनियम भाग -२ दिनांक १७.४.२०१वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ भाग पहिला उपविभाग-२ अ.क्र.२७-अ नियम क्र. ७६ अन्वये नविन संगणक यंत्रणा खरेदी करणे आणि श्रेणीवाढ करण्यास मंजूरी देणे यासाठी पूर्ण अधिकार प्रशासनिक विभागाला असलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१७११०७१५५६४०७३०३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Santosh Vithal Rokade
Date: 2017.11.07 15:45:14 +05'30'

(संतोष वि. रोकडे)
शासनाचे अवर सचिव

प्रति,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखापरीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
४. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, नवी मुंबई
५. वित्त विभाग (विनियम) मंत्रालय, मुंबई-३२
६. निवडनस्ती (रोस्वरो-१).